**प्रेस नोट** **दि.२४/०८/२०२६**

## ‘‘ एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन ३०२ ग्रॅम वजन अं.कि.रू. ३,५०,००,०००/- चा गर्दा पावडर ‘हेरॉईन’ अंमली पदार्थ जप्त करून आरोपीस अटक केलेबाबत ’’

एमआयडीसी पोलीस ठाणेचे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सपोनि खोलम व पथक हे अंमली पदार्थ सेवन, खरेदी व विक्री करणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई करण्याकरीता पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/०८/२०२६ रोजी रात्री गस्त करीत होते. पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना दिनांक २३/०८/२०२६ रोजी रात्री ००:१० वाजताचे सुमारास हेमंत करकरे गार्डनच्या गेट समोर, सहकारी भंडारच्या बाजूला, पूनम नगर, जोगेश्वरी (पुर्व) मुंबई येथे एक इसम संशयास्पद फिरत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यावरून सपोनि खोलम यांना त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने सपोनि खोलम व पोलीस पथकाने त्यास हटकले असता एक इसम हा त्या ठिकाणाहून घाई गडबडीनी पोलीसांना टाळून निघुन जाण्याचा प्रयत्न करू लागला म्हणून त्यास पोलीस पथकाच्या मदतीने जागीच अटकाव करण्यात आला. सदर वेळी सपोनि खोलम यांनी सदर इसमास नमुद ठिकाणी येण्याचे व तेथुन पळून जाण्याचे कारण विचारले असता त्याने प्रथम उडवा उडविचे उत्तरे दिली. त्यानंतर सदर इसमास विश्वासात घेवून अधिक सखोल विचारपुस केली असता त्याच्या ताब्यात गर्दा पावडर ‘हेरॉईन’ हा अंमली पदार्थ असल्याचे त्यांनी सपोनि खोलम यांना सांगितले. सपोनि खोलम यांनी एनडीपीएस ॲक्ट १९८५ च्या सर्व नियमांचे पालन करून नमुद इसमांची अंगझडती घेतली असता सदर इसमाकडे ३०२ ग्रॅम वजन अं.कि.रू. ३,५०,००,०००/- चा गर्दा पावडर ‘हेरॉईन’ अंमली पदार्थ स्वत:च्या कब्जात विक्री, वाहतुक व व्यापार यासाठी बाळगताना मिळून आला म्हणुन पोलीस पथकातील पो.ह.क्र. ०६.१६४५/गौतम बडे, यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र.९४३/२०२६ कलम ८ (क) सह २१ (क) एन.डी.पी.एस. १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरचा अंमली पदार्थ तो एमआयडीसी परिसरात पुरवठा करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे. अशा प्रकारे एमआयडीसी पोलीस ठाणेचे अमली पदार्थाचे पथकाचे अधिकारी सपोनि खोलम व पथक यांनी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या आरोपीतास शिताफिने अटक करून त्याकडुन ३०२ ग्रॅम वजन अं.कि.रू. ३,५०,००,०००/- चा गर्दा पावडर ‘हेरॉईन’ अंमली पदार्थ जप्त केल्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई डॉ.श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, डॉ.श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, श्री. योगेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक घनश्याम नायर व पोलीस निरीक्षक गुन्हे सुनिल करांडे यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली सहा.पोलीस निरीक्षक उल्हास खोलम, पो.ह.क्र.०६.१६४५/गौतम बडे, पो.ह.क्र. ४९२५/बाबू येडगे, पो.ह.क्र.०७.१०२८/ सचिन ठोंबरे व पो.शि.क्र.११०५९६/बिनल शिंगाणे यांनी पार पाडलेली आहे.